# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:06.02.2024** **वारःमंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या संयुक्त अरब आमिरातीच्या दौऱ्यावर
2. सत्तारुढ राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी होण्याची राष्ट्रीय लोकदल पक्षाची घोषणा.
3. सरकारी ईमार्केटप्लेस म्हणजे जीईएम या पोर्टलवरील व्यवहारांचं मूल्य तीन लाख कोटी रुपयांवर.
4. जागतिक रेडिओ दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन आणि
5. भारताचा टेनिसपटू सुमीत नागल एटीपी एकेरी मानांकनांमध्ये 98 व्या स्थानी.

**पंतप्रधान यूएई भेट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवस संयुक्त अरब आमिरातीच्या दौऱ्यावर जात आहेत. या भेटीत पंतप्रधान संयुक्त अरब आमिरातीचे अध्यक्ष शेख मोहंमत बिन झायेद अल नाह्यान यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. उभय नेत्यांमधली गेल्या आठ महिन्यांमधली ही पाचवी भेट आहे. पंतप्रधान संयुक्त अरब आमिरातीचे उपाध्यक्ष, पंतप्रधान आणि संरक्षणमंत्र्यांचीही भेट घेतील, असं परराष्ट्र सचिव विनयमोहन क्वात्रा यांनी सांगितलं. या भेटीत पंतप्रधान अक्षर पुरुषोत्तम स्वामिनारायण संस्थेतर्फे अबूधाबीत उभारल्या जात असलेल्या त्या देशातल्या पहिल्या मंदिराचंही उद्घाटन करतील. मोदी उद्या दुपारी कतारलाही भेट देणार असून, त्या देशाचे आमिर शेख तामिम बिन हमद यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**राष्ट्रपती कार्यक्रम**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज गुजरातच्या वळसाड जिल्ह्याच्या धरमपूरमधल्या श्रीमद् राजचंद्र मिशनला भेट देतील. धरमपूरमध्ये त्या गुजरातमधल्या आदिवासी समाजाच्या सदस्यांशी संवाद साधतील.

**राष्ट्रीय लोकदल**

राष्ट्रीय लोकदल पक्षानं सत्तारुढ राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी होण्याची घोषणा केली आहे. पक्षाचे अध्यक्ष जयंत चौधरी यांनी नवी दिल्लीत काल ही घोषणा केली. सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन आणि जनतेसाठी चांगलं करण्याच्या दृष्टीनं पक्षानं हा निर्णय घेतल्याचं चौधरी यांनी सांगितलं. पक्षाचे आमदार आणि कार्यकर्ते यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेतल्याचं ते म्हणाले. माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंह यांना भारतरत्न सन्मान जाहीर करणं हा फक्त आपल्या कुटुंबाचा नव्हे, तर देशातले शेतकरी, युवक आणि गरिबांचा सन्मान असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**नितीश कुमार**

बिहारमध्ये नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं विश्वासदर्शक ठराव जिंकला आहे. राष्ट्रीय जनता दलाचे आमदार चेतन आनंद, नीलम देवी आणि प्रल्हाद यादव यांनी नितीशकुमार यांच्या बाजूनं मतदान केल्यामुळे नितीशकुमार यांना एकंदर 129 मतं मिळाली. बिहार विधानसभेत 243 सदस्य असून, विरोधी महाआघाडीच्या नेत्यांनी सभात्याग केला. संयुक्त जनता दलाच्या एका सदस्यानं मतदानात भाग घेतला नाही, तर मुस्लिम लीगच्या एका सदस्यानं विश्वास ठरावाच्या विरुद्ध मतदान केलं.

**<u>अशोक चव्हाण</u>**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते आमदार अशोक चव्हाण यांनी काल विधिमंडळ सदस्यत्वाचा तसंच काँग्रेस कार्यकारिणी आणि पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा  राजीनामा दिला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी चव्हाण यांचा राजीनामा स्वीकारला.  आगामी काही दिवसात आपण आपली पुढची राजकीय भूमिका जाहीर करू असं चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं. हा निर्णय आपला वैयक्तिक निर्णय असून, अद्याप कोणत्याही पक्षानं आपल्याशी संपर्क साधला नसल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<u>कॉंग्रेस बैठक</u>**

दरम्यान, चव्हाण यांच्या राजीनाम्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कॉंग्रेस नेत्यांची काल मुंबईत बैठक झाली. अजून कोणी आमदार पक्ष सोडून जाणार नाहीत असा विश्वास पक्षाचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला. राज्यसभा निवडणुकीसाठी पक्षाच्या विधिमंडळ सदस्यांची 14 आणि 15 तारखेला बैठक होणार असल्याची माहिती त्यांनी दिली आणि आवश्यकता भासल्यास व्हिप जारी केला जाईल असंही स्पष्ट केले. अशोक चव्हाण यांनी पक्ष सोडण्यामागची कारणं माहीत नसल्याचं ते म्हणाले. विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही चव्हाण यांच्या राजीनामा धक्कादायक असल्याचं मत व्यक्त केलं.

**<u>ई-मार्केटप्लेस</u>**

सरकारी ईमार्केटप्लेस म्हणजे जीईएम या पोर्टलवरील व्यवहारांचं मूल्य तीन लाख कोटी रुपयांवर पोचलं आहे. गेल्या वर्षी हे मूल्य दोन लाख कोटी रुपये इतकं होतं. जीईएमचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांतकुमारसिंह यांनी ही माहिती दिली. या पोर्टलवर रोज होणाऱ्या व्यवहारांचं मूल्यही गेल्या वर्षीच्या 504 कोटी रुपयांवरून यंदा 914 कोटी रुपयांपर्यंत वाढल्याचं त्यांनी सांगितलं. भ्रष्टाचार आणि गोंधळ टाळण्यासाठी सरकारी खरेदी या पोर्टलच्या माध्यमातून करण्याचं पाऊल केंद्र सरकारनं उचललं आहे, असं प्रशांतकुमारसिंह म्हणाले.

**<u>रेडियो दिन</u>**

देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेलं आकाशवाणी हे अद्वितीय आणि सशक्त माध्यम आहे; अनेक प्रसार माध्यमांच्या सध्याच्या युगातही आकाशवाणीच्या कार्यक्रमांचं आणि बातम्यांचं महत्त्व आजही अबाधित आहे, असं आकाशवाणीच्या प्रधान महासंचालक वसुधा गुप्ता यांनी सांगितलं. जागतिक रेडियो दिनानिमित्त आकाशवाणीवरून दिलेल्या संदेशात त्या आज बोलत होत्या. नभोवाणी या माध्यमाबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी 2012 पासून दरवर्षी; 13 फेब्रुवारी हा दिवस जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा केला जातो. 'रेडिओ : ज्ञान, माहिती आणि मनोरंजन देणारं शतक' अशी यंदाच्या रेडियो दिनाची संकल्पना आहे. चेन्नईच्या अण्णा युनिव्हर्सिटीमध्ये माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने दोन दिवसीय प्रादेशिक समुदाय रेडिओ संमेलनाचं आयोजन केलं आहे. त्याचं उद्घाटन आज केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंग ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. दक्षिणेकडची राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधली 117 समुदाय रेडिओ केंद्रं या संमेलनात सहभागी होतील.

**<u>पाकिस्तान निकाल</u>**

पाकिस्तानच्या निवडणूक आयोगानं सार्वत्रिक निवडणुकीचे अंतिम निकाल काल जाहीर केले. सर्व पक्षांचं संख्याबळ लक्षात घेता संसदेत स्पष्ट कौल कोणत्याच पक्षाला नसल्यामुळे आघाडी सरकारशिवाय गत्यंतर नसल्याचं स्पष्ट झालं आहे. त्या देशातील संसदेच्या 266 जागांपैकी 93 जागांवर अपक्ष उमेदवार निवडून आले आहेत. हे बहुतांश अपक्ष उमेदवार इम्रान खान यांच्या पाकिस्तान तेहरिके इन्साफ म्हणजे पीटीआय पक्षाचा पाठिंबा असलेले आहेत. पाकिस्तान मुस्लिम लीग नवाझ पक्षाला 75, तर पाकिस्तान पीपल्स पार्टीला 54 जागा मिळाल्या आहेत. पाकिस्तान मुस्लिम लीग नवाझ पक्षाला लष्कराचा पाठिंबा आहे, पण पीटीआय पक्षालाही पूर्ण बहुमत नसल्यामुळे कोणत्या तरी दोन पक्षांना एकत्र यावं लागणार आहे. दरम्यान, सार्वत्रिक निवडणूक गुरुवारी होऊनसुद्धा त्याचे अंतिम निकाल जाहीर करायला निवडणूक आयोग विलंब लावत असल्यामुळे त्यामागं काही तरी काळंबेरं

असल्याचाही आरोप करण्यात आला होता. दिशाहीन निकाल लक्षात घेता देशात राजकीय अस्थिरता बराच काळ कायम राहील असं विश्लेषकांचं म्हणणं आहे.

**<u>नेदरलँड न्यायालय इस्रायल</u>**

नेदरलँडच्या न्यायालयाने काल इस्रायलला होणारा एफ 35 लढाऊ विमानाच्या भागांचा पुरवठा बंद करण्याचे आदेश सरकारला दिले. गाझाविरुद्धच्या युद्धात इस्रायल आंतरराष्ट्रीय कायद्यांची पायमल्ली करण्यासाठी हे भाग वापरत असल्याचा आरोप होत आहे. परराष्ट्र धोरण हे देशाने ठरवलं पाहिजे, न्यायालयाने नाही, असा युक्तिवाद आपण सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून करणार असल्याचं नेदरलँड सरकारने म्हटलं आहे. इस्रायलने आपल्यावरचे आरोप फेटाळून लावले असून आपण सध्या हमासच्या दहशतवाद्यांशी लढत असल्याचं स्पष्ट केलं आहे.

**<u>शेतकरी आंदोलन</u>**

शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी एक महिन्यासाठी शहरात ट्रॅक्टर आणि ट्रॉली आणायला आणि सार्वजनिक सभा घ्यायला बंदी घातली आहे. शहरात स्फोटक पदार्थ आणण्यावरही बंदी घालण्यात आली आहे. हरियाना आणि उत्तर प्रदेशसह शेजारील राज्यांमधून प्रवेश करणाऱ्या सर्व वाहनांची कसून तपासणी केली जाईल, असं पोलिसांनी म्हटलं आहे.

**<u>सुमित नागल</u>**

भारताचा सुमीत नागल हा टेनिसपटू एटीपी एकेरी मानांकनांमध्ये 98 व्या स्थानी पोचला आहे. चेन्नई ओपन चॅलेंजर स्पर्धांमधल्या विजयामुळे त्याचं मानांकन 23 अंकांनी पुढे सरकलं आहे. या स्पर्धेत इटलीच्या लुका नर्डी याचा 6-1, 6-4 असा पराभव करत त्याने चॅलेंजर पातळीवरचा पाचवा एकेरी विजय मिळवला. आघाडीच्या 100 मानांकनांमध्ये पोचणारा सुमीत हा पी. गुन्नेस्वरन याच्यानंतरच्या दुसरा भारतीय ठरला आहे. गेल्या महिन्यात ग्रँड स्लॅममध्ये कझाकस्तानच्या 27 व्या मानांकित अलेक्झांडर बुब्लिकचा पराभव करून तो मानांकित खेळाडूला हरवणारा पहिला भारतीय ठरला.

**<u>महिला हॉकी ओडिशा</u>**

ओडिशात काल झालेल्या महिलांच्या एफआयएच हॉकी प्रो लिगमध्ये चीनने भारताचा 2-1 असा पराभव केला. राऊरकेलाच्या बिरसा मुंडा आंतरराष्ट्रीय हॉकी मैदानात हा सामना झाला. सामन्याच्या पूर्वार्धात भारताच्या संगीता कुमारीने दमदार सुरुवात केली. पुढे चीनच्या बिंगफेंग गू हिनं दोन गोल केले. याच ठिकाणी उद्या म्हणजे बुधवारी होणाऱ्या सामन्यात भारतापुढे नेदरलँडच्या संघाचं आव्हान असेल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.